




दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शुक्रवार २० सप्टेंबर २०२४ | अंक २८५ | पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



**प्रतिनिधी नेमणे आहे.**

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर


# आता मनोज जरांगे पाटील यांचा भाऊही उपोषण करणार, मुख्यमंत्र्यांना भेटून इशारा

## सरकारच्या अडचणी वाढणार?


मनोज जरांगे पाटील यांचं उपोषण सुरू असताना भावाने देखील उपोषणाचं हत्यार उपसलं आहे. मनोज जरांगे यांचे बंधू भाऊसाहेब जरांगे हे बीड जिल्ह्यातील साक्षाळ पिंपरी येथे वास्तव्यात आहेत. मनोज जरांगे पाटलांनी गेल्या वर्षेभरामध्ये मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून उपोषण केले आहे. त्यांनी शेतकऱ्यांसाठी देखील पुन्हा आपण उपोषण करणार असल्याची घोषणा केली होती. मात्र आता त्यांचे मोठे भाऊ भाऊसाहेब जरांगे यांनी जायकवाडी प्रकल्पातील पाणी सिंदफणा नदी पात्रात सोडण्यात यावे, अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मराठवाडा मुक्ती संग्राम दिना दिवशी केली आहे. यावेळी त्यांनी जर मागणी लवकरात लवकर जर मान्य नाही केली तर आपण शेतकऱ्यांना घेऊन उपोषण करणार असल्याचे देखील निवेदनात म्हटलं आहे. त्यामुळे आता सरकारच्या अडचणी वाढणार का? ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

मराठा नेते मनोज जरांगे पाटील मराठा आरक्षणासाठी आक्रमक झाले आहेत. विशेष म्हणजे मनोज जरांगे यांनी पुन्हा आपल्या मागण्यांसाठी जालन्यातील अंतरवली सराटी गावात आमरण उपोषणाचं हत्या उपसलं आहे. त्यामुळे सरकारची डोकेदुखी वाढली आहे. असं असताना आता मनोज जरांगे पाटील यांचे बंधू भाऊसाहेब रावसाहेब जरांगे यानीदेखील उपोषणाचं हत्या उपसलं आहे. भाऊसाहेब जरांगे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत आपल्या मागणीची माहिती दिली. तसेच आपली मागणी मान्य झाली नाही तर आपण देखील आमरण उपोषणाला बसणार असल्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे राज्य सरकारची आणखी डोकेदुखी वाढण्याची चिन्हं आहेत. सरकार जरांगे बंधूंची मनधरणी





करण्यात आता कितपत यशस्वी होतं ते पाहणं आता सर्वात जास्त महत्त्वाचं ठरणार आहे. विशेष म्हणजे आगामी काळात विधानसभेची निवडणूक असणार आहे. त्यामुळे जरांगे बंधूंची मनधरणी करणं सरकारसाठी महत्त्वाचं असणार आहेमराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचे पुन्हा एकदा आमरण उपोषण अंतरवली सराटी येथे चालू आहे. मराठा समाजाला कुणबी जात प्रमाणपत्र मिळावं आणि सग्या सोयऱ्यांची अंमलबजावणी करण्यात



## मांजरसुंबा येथे रविवारी मोफत आरोग्य शिबिर

# गरजूंनी शिबिराचा लाभ घ्यावा -डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर

**बीड (प्रतिनिधी)**

दि.19 : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून बीड तालुक्यातील मांजरसुंबा येथे महिला वारकरी आश्रमात रविवारी (दि.22) सकाळी 10 ते 5 या वेळेत मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. बीड विधानसभा मतदारसंघात वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांची गरज पाहता मोफत आरोग्य शिबिरे आयोजित केलेली आहेत. आतापर्यंत झालेल्या शिबिराला मोठा प्रतिसाद मिळाला. आता मांजरसुंबा परिसरातील नागरिकांच्या मागणीला प्रतिसाद देत मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन केले आहे. या शिबिरात हृदयाची अन्जिओग्राफि, कॅन्सर शस्त्रक्रिया, अजिओप्लास्टी, मुत्रमार्ग शस्त्रक्रिया, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, स्त्रियांचे आजार अशा 17 आजारावर निदान व मोफत उपचार केले जाणार आहेत. रुग्णाला पुढील उपचारासाठी गरज असल्यास सोय करण्यात आली आहे. नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी 9421615928, 8421105430, 8208907751 या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच, मोफत आरोग्य शिबिराचा गरजूंनी लाभ घ्यावा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले आहे.

# खुणाच्या आरोपातून आरोपीला जामीन मंजूर. ॲड.शशिकांत सावंत

**बीड (वार्ताहर)**

Ad. शशिकांत सावंत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब बीड यांनी दिनांक 18/ 9/ 2024 रोजी बहुचर्चित राक्षस भुवन तालुका जिल्हा बीड येथील खून प्रकरणातील मुख्य आरोपी दशरथ लोणकर यांना जामीन मंजूर केली. घटनेची हाकीकत आशि की यातील फिर्यादी मारुती कैलास माने, राहणार राक्षस भवन तालुका जिल्हा बीड यांनी पिंपळनेर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली होती त्यास गुन्हा र.न.१४१/२०२४ . कलम 302 व अॅट्रॉसिटी ॲक्ट प्रमाणे नोंदवून सदरे फिर्यादीमध्ये फिर्यादीने म्हटले होते की त्यांचा मुलगा नामे जालिंदर माने हा बेपत्ता असून त्याचा खून हा आरोपी दशरथ लोणकर यांनी केलेला आहे, सदर फिर्यादीच्या अनुषंगाने मयताचे मुंडके शासकीय विहिरीमध्ये आढळून आले होते व धड बेपत्ता होते सदर मुंडक्याच्या अनुषंगाने पिंपळनेर पोलीस स्टेशन यांनी डी.एन.ए. चाचणीसाठी अहवाल प्रयोगशाळेमध्ये पाठवला व सदरचा अहवाल हा मयत मारुती माने याचाच असल्याचे निष्पन्न झाले त्या अनुषंगाने पिंपळनेर पोलीस



स्टेशन यांनी आरोपी दशरथ लोणकर यांना अटक करून सदर प्रकरणात पोलीस कस्टडीमध्ये आरोपी असताना तपास केला व गुन्ह्यात वापरलेले हत्यार जप्त केले व एकूण 14 साक्षीदारांचे जबाब नोंदवून मा. न्यायालयामध्ये दोषारोप पत्र दाखल केले त्यास विशेष केस नंबर १२१/२०२४ पडले व सदरचे प्रकरण मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड यांच्याकडे वर्ग करण्यात आले सदर प्रकरणांमध्ये आरोपीच्या वतीने जामीन अर्ज दाखल करण्यात आला त्यामध्ये मा. न्यायालयाने आरोपी ,तसेच फिर्यादी व सरकारी पक्ष यांचा जामीन अर्जावर युक्तिवाद ऐकून घेतला व सदर युक्तीवादामध्ये आरोपीचा बचाव ग्राह्य धरून मा. न्यायालयाने आरोपीस जामीन मंजूर केला आरोपीच्या वतीने Ad. शशिकांत सावंत यांनी बाजू मांडली त्यांना Ad. मुकुंद लोणकर,Ad. अभिषेक बहिर,Ad. माऊली डाके,Ad. योगेश भांडवले यांनी सहकार्य केले.








# अशोक गव्हाड यांची मराठा आरक्षण समर्थनार्थ पिंपरी राजा ते अंतरवाली सराटी पदयात्रा.

**दैनिक लोकआरंभ//**

पिंपरी राजा येथील रहिवासी मनोज दादा जरांगे यांचे कट्टर समर्थक अशोक गव्हाड यांनी मनोज दादा जरांगे यांच्या समर्थनार्थ पिंपरी राजा ते अंतरवाली सराटी मराठा जागर पदयात्रा काढली असून मनोज दादा जरांगे यांनी घेतलेली मराठा आरक्षणा संदर्भात मनोज दादा जरांगे यांनी घेतलेली मराठा आरक्षणा संदर्भात भूमिका विशद करत एक मराठा लाख मराठा लढेंगे जितेंगे हम सब जरांगे कोण म्हणतो देनार नाही घेतल्याशिवाय राहणार नाही आरक्षण आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचे अशा गगनभेदी घोषणा देत पिंपरी राजा वरलीवेस येथून पदयात्रास सुरुवात करण्यात आली यावेळी मराठा बांधव मोठ्या संख्येने सहभागी होते. अशोक गव्हाड यांच्या पदयात्रेस सकल मराठा समाज पिंपरी राजा च्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.

मनोज दादा जरांगे गेले अनेक दिवसापासून मराठा आरक्षणासंदर्भात लोकशाही मार्गाने आंदोलने उभा करत आहेत लाखोचे मोरचे करोडो लोकांच्या सभा घेऊन समाज जनजागृती चे काम करत आहेत. आता सध्याही ते अंतरवाली सराटी येथे उपोषणात बसले असून उपोषण स्थळाची माती मस्तकी लावण्यासाठी मी पिंपरी राजा ते अंतरवाली सराटी पायी यात्रा काढून समाज जागृतीचे काम करत आहेत.

अशोक पाटील गव्हाड

मनोज दादा जरांगे यांचे कट्टर समर्थक पिंपरी राजा

# कोहिनीच्या जिल्हा परिषद शाळेची दुरावस्था एकाच वर्गखोलीत बसतात ४ इयत्तांचे विद्यार्थी , मोडकळीस आलेल्या वर्गखोल्या जीवघेण्या ; तातडीने दुरूस्तीची मागणी :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.१९ ) आष्टी तालुक्यातील कोहिनी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेची दुरावस्था झाली असुन एकुण ४ वर्गखोल्या पैकी ३ वर्गखोल्या धोकादायक मोडकळीस आलेल्या असल्याने गेल्या २ वर्षांपासून इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतच्या वर्गातील विद्यार्थ्यांना एकाच वर्गखोलीत बसुन जीव मुठीत घेऊन शिक्षण घेण्याची वेळ आली आहे. ग्रामपंचायत आणि शालेय व्यवस्थापन यांनी वर्गखोल्यांची दुरुस्ती करण्यात यावी यासाठी लेखी ठरावा द्वारे मागणी करून सुद्धा शिक्षण विभागाकडून दुर्लक्ष करण्यात आले आहे.मोडकळीस झालेल्या वर्गखोल्यांमुळे अपघाताची शक्यताही वाढली असुन तातडीने नविन वर्गखोल्यांसाठी अथवा वर्गखोल्या दुरूस्तीसाठी निधी देण्यात यावा अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) जिल्हा परिषद बीड यांना करत आंदोलनाचा इशारा दिला आहे. गटशिक्षणाधिकारी व उप अभियंता जि.प.बांधकाम यांना वर्गखोल्या दुरूस्तीसाठी मागणी केली आहे:- काकडे ( मुख्याध्यापक कोहिनी जि.प.शाळा) कोहीनी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत इयत्ता १ ली ते चौथी पर्यंत ४५ विद्यार्थी पटसंख्या असुन शाळा खोल्यांची दुरूस्ती तसेच नवीन वर्गखोल्यांची मागील अनेक वर्षांपासून शालेय व्यवस्थापन समिती मार्फत गटशिक्षणाधिकारी आष्टी व उप अभियंता जि.प.बांधकाम उपविभाग आष्टी मागणी करण्यात आली आहे परंतु अद्याप याबाबत उपाययोजना करण्यात आलेली नाही.असे शाळेचे मुख्याध्यापक काकडे यांनी सांगितले.

वर्गखोल्या दुरूस्तीसाठी वरिष्ठ कार्यालयाकडे मागणी:- सुधाकर यादव ( गटशिक्षणाधिकारी शिक्षण विभाग आष्टी)



कोहिनी येथील जि.प.शाळेच्या वर्गखोल्या दुरुस्ती व नविन खोल्यांचे बांधकाम करण्यासाठी वरिष्ठ कार्यालयाकडे वेळोवेळी मागणी करण्यात आलेली असुन वरीष्ठ कार्यालयाकडुन मंजुरी प्राप्त झाल्यानंतर लवकरच वर्गखोल्यांची दुरुस्ती अथवा नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम करून विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करण्यात येईल.आज मी कोहिनी येथील शाळेला भेट देऊन आढावा घेणार असल्याचे सुधाकर यादव गटशिक्षणाधिकारी शिक्षण विभाग आष्टी यांनी डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना सांगितले.

गटशिक्षणाधिका-यांच्या दालनात शाळा भरवणार:- गणेश भवर ( सामाजिक कार्यकर्ते) कोहिनी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या दुरावस्थेबद्दल शिक्षण विभागाला वारंवार ग्रामपंचायत आणि शालेय व्यवस्थापन विभागाने सूचना देऊनही याकडे दुर्लक्ष करण्यात येत असुन तातडीने वर्गखोल्यांची दुरुस्ती करण्यात यावी अन्यथा गटशिक्षणाधिकारी यांच्या दालनात शाळा भरविण्यात येणार असल्याचा ईशारा सामाजिक कार्यकर्ते गणेश भवर यांनी दिला आहे.

# जिल्ह्यात २७ सप्टेंबर च्या मध्यरात्रीपर्यंत मनाई आदेश लागू

बीड, दि. 19:- मराठा, ओबीसी,धनगर व इत्तर समाजाचे, राजकीय पक्षाचे, संघटनांचे, विविध प्रकारचे होणारे उपोषणे,आंदोलने, सभाचे अनुषंगाने तसेच सद्या जिल्हयात राजकीय हलचाली व घडामोडीमुळे मोर्चे, निदर्शने, आंदोलने सुरु आहेत. किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच आगामी कालावधीत मराठा,ओबीसी,धनगर आरक्षण मागणीसाठी सर्व समाज अक्रमक आहे या करिता कायदा व सुव्यवस्था अबाधित राहवी यासाठी मनाई आदेश जारी करण्यात आले असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे. दिनांक 14 सप्टेंबर 2024 रोजीचे 00.01 वाजेपासून ते 27 सप्टेंबर 2024 रोजीचे 24.00 वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा 37 (1) (3) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता कलम 37 (1) (3 ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांनी हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही.

कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय 15 दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

# नेकनूर पोलिसांची बेलखंडीत धाड; साडेचार किलो गांजा जप्त

## नेकनुर पोलिस स्टेशन हद्दीत गांजाची विक्री जोरात सुरु

(बीड-विवेक कुचेकर) गायरान जमिनीत गांजाची लागवड केल्याची माहिती नेकनूर पोलिसांना मिळताच बेलखंडी पाटोदा येथे कारवाई करत साडेचार किलो गांजा ची झाडे जप्त करण्यात आली. बेलखंडी शिवारात असलेल्या गायरान जमीन सर्वे नंबर 21 मध्ये गांजाची लागवड केल्याची गुप्त माहिती नेकनूर पोलिसांना मिळाली. या माहितीच्या अनुषंगाने सपोनी चंद्रकांत गोसावी, पो उप नि रोकडे, मंडल अधिकारी दरपे, शासकीय पंच, पोलिस स्टेशन स्टाफ सह जाऊन छापा घातला. यावेळी शेतात गांजाची 15 लहान मोठी झाडे त्याचे वजन 4.465 किलोग्रॅम असे मिळून आले. त्याचा दोन शासकीय पंचा समक्ष पंचनामा करून जप्त केले असून सदर जमीन कसणारे मोहन किसन मोरे,महावीर मोहन मोरे, संतोष मोहन मोरे,जितू मोहन मोरे सर्व रा. बेलखंडी यांच्या विरोधात नेकनूर पोलिसात गुरन 273/2024 20() अ1,8(क) एनडीपीएस अक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान ही कारवाई सपोनि चंद्रकांत गोसावी, पीएसआय अप्पासाहेब रोकडे, पो.ह.राऊत,पो.ह डोंगरे, पो.ह बळवंत,पोना भंडाणे, शपोना राऊत, पोना राख, पोअ तांदळे, काळे, क्षीरसागर, ढाकणे यांनी केली असून गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि चंद्रकांत गोसावी हे करत आहेत.

# शेतकऱ्यांच्या बँक खात्यावरील होल्ड काढण्यात यावे नसता तिव्र आंदोलन- भाई विष्णुपंत घोलप

पाटोदा (प्रतिनिधी) बीड जिल्ह्यातील गेल्या वर्षीच्या पावसाच्या तुटीमुळे आणि काही वेळा सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांची पिके उध्वस्त झाली होती त्यामुळे शेतकऱ्यांचे कर्ज गेल्या दोनवर्षापासून थकीत असल्यामुळे शेतकऱ्यांचे बँक खाते होल्ड करण्यात आलेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना पिकविमा,पिक अनुदान व पी.एम. किसान निधी,ओम नमो सन्मान निधी,संजय गांधी निराधार निधी आणि इतर शासनाच्या योजनेचे आलेले पैसे मिळण्यास बँकेने होल्ड टाकल्यामुळे पैसे मिळण्यास अडचणी येत आहेत तरी मे.साहेबांनी राष्ट्रीयकृत बँकाने होल्ड केलेले खाते



चालु करण्याचे संबंधीतांना आदेश द्यावेत,असे लेखी निवेदनाव्दारे उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा यांना भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी कळविले आहे. माहितीस्तव राज्याचे कृषी मंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री मुंडे साहेब व शेकापचे सरचिटणीस आ.भाई जयंत पाटील आणि बीड जिल्ह्याचे खासदास मा.बजरंग(बप्पा) सोनवणे यांना दिले आहे.

# शिवाजीराव रांजवण यांनी घेतली शरद पवारांची भेट

## माजलगाव मतदारसंघातील सर्व राजकीय परिस्थितीवर चर्चा केली.

माजलगाव - : येथील सिंदफणा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा कार्यारंभचे संपादक शिवाजीराव रांजवण यांनी गुरूवारी सकाळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची मुंबईत सिल्वर ओक येथे भेट घेतली. यावेळी पवार आणि रांजवण यांच्यात माजलगाव विधानसभा मतदारसंघाच्या अनुषंगाने राजकीय चर्चा देखील झाली. यावेळी डॉक्टर सेलचे प्रदेशाध्यक्ष डॉ. नरेंद्र काळे यांची उपस्थिती होती.



महायुतीला राज्यात सत्तेत येण्यापासून रोखण्यासाठी शरद पवारांनी चांगलीच कंबर कसली आहे. त्यासाठी त्यांनी अनेक मतदारसंघातील इच्छुकांशी, संस्थाचालकांशी व इतर राजकीय पदाधिकार्यांशी वैयक्तिक चर्चा केली. त्यांची मते जाणून घेतली. माजलगाव मतदारसंघात अद्यापही महाविकास आघाडीकडून कोण लढणार हे स्पष्ट नाही. त्यामुळे दररोज वेगवेगळ्या नावाची मतदारसंघात चर्चा होताना दिसत आहे. माजलगावची सामाजिक, राजकीय गणितं वेगळी आहेत. मतदारसंघातील शेतकरी हा ऊस उत्पादक असल्याने येथील राजकारण ऊसाभोवती फिरते. परंतु माजलगावात आता मोठ्या प्रमाणावर खासगी साखर कारखाने, गूळ युनिट उभे राहील्याने प्रस्थापितांची मक्तेदारी मोडीत निघाली आहे. बदलत्या राजकीय परिस्थितीच्या अनुषंगाने कार्यारंभचे संपादक शिवाजीराव रांजवण यांनीही आज सकाळी शरद पवारांची भेट घेत त्यांच्याशी माजलगाव मतदारसंघातील सर्व राजकीय परिस्थितीवर चर्चा केली.

# १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिना निमित्ताने शालेय साहित्य वाटप.

वडवणी/प्रतिनिधी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन हा मराठवाड्यातील जनतेचा स्वातंत्र्य दिन म्हणून ओळखला जातो. पूर्वी मराठवाडा हा हैद्राबाद संस्थानात होता. त्यामुळे मराठवाड्याच्या गावागावात हा मुक्ती संग्राम लढला गेला. निजामाच्या कुरघोड्या रोखण्यासाठी अनेक नेतृत्व करणारे व्यक्तिमत्त्व पुढे आले. या सर्व शुरवीरांच्या रूपाने मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यात स्वातंत्र्य संग्राम



उत्स्फूर्तपणे लढला गेला. अनेकांनी जीवाची तमा न बाळगता मुक्तीसाठी हौतात्म्य पत्करले. हैदराबाद संस्थानातील अन्यायी राजवटीविरुद्धचा लढा मराठवाड्याच्या जनतेने यशस्वी केला. यानंतर 1 मे 1960 रोजी अधिकृतरित्या महाराष्ट्राची ओळख बनून मराठवाडा प्रदेश राज्यात सामील झाला. या मुक्ती संग्रामात जनतेने केलेला संघर्ष हा सदैव स्फूर्तीदायी राहील. हुतात्मा झालेल्या सर्व वीरांना विनम्र अभिवादन... वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव येथे दि. 17 सप्टेंबर 2024 वार मंगळवार रोजी अगदी आनंदात व संपन्न झाला आहे... दरवर्षी प्रमाणे याही वर्षी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवगाव येथे 17 सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिन शाळेचे मुख्याध्यापक हाडुळे सर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले आहे... व त्यानंतर विद्यार्थ्यांचे भाषण पार पडले .. गवळी ज्ञानेश्वर सर यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिना निमित्ताने आपले मनोगत व्यक्त केले. व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवगाव चे नुतन अध्यक्ष गणेश राजाभाऊ गवळी व उपाध्यक्ष दिनकर सुरवसे यांच्या हस्ते अंगणवाडी येथील लहान विध्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप केले या.. प्रसंगी अंगणवाडी कार्यकर्ती श्रीमती छाया सुरवसे. व अंगणवाडी मदतनीस .सौ गिता गवळी .सह शिक्षक लांडगे सर गाढवे मडम पवार मडम जिल्हा कार्यक्रमाचे सुत्रसंचालन लांडगे सर यांनी केले आहे व गावतील विविध क्षेत्रातील सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य व युवा पत्रकार ईत्यादी मान्यवर उपस्थित होते

# आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी करणार आज उद्धाटन

बीड, दि. 19 :- कौशल्य विकास या संकल्पनेचा अधिकाधिक लाभ राज्यातील युवक/युवतींना व्हावा, या दृष्टीकोनातून राज्यामधील नामांकित महाविदयालयांमध्ये "कौशल्य विकास केंद्र" स्थापन करून महाविदयालयीन युवक/युवतींना रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने या विभागामार्फत "आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र(ACKVK)" या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. योजनेचा शुभारंभ दि.20/09/2024 रोजी मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आभासी पध्दतीने बीड जिल्हयातील महाविदयालयात होत आहे.

त्यामध्ये कै.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर,आर्टस,कॉमर्स क्षीरसागर कॉलेज बीड, कै.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर,अॅग्रीकल्चर,,नाथ महाविद्यालय,बीड, विश्वनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,वांगी, ओम नर्सिंग स्कुल,बीड, समर्थ नर्सिंग,बीड, शिव कॉलेज ऑफ मॅनेजमेंन्ट सायन्स,बीड, नविन उच्च माध्यमिक विदयालय,लिंबारूई ता.जि.बीड, देवगिरी महिला विद्यालय,बीड, तुलसी कॉम्प्युटर सायन्स अॅन्ड इन्फॉरमेशन टेक्नालॉजी,बीड, कलासाई कॉलेज,बीड, तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन,बीड, गोरखक्षनाथ विदयालय अॅन्ड ज्युनियर कॉलेज डेकणमोहा ता.जि.बीड, यशवंतराव चव्हाण कॉलेज,अंबाजोगाई ,कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अॅन्ड इन्फॉरमेशन टेक्नालॉजी, अंबाजोगाई, जय किसान महाविद्यालय,आपेगाव,अंबाजोगाई, वसुंधरा कॉलेज ऑफ आर्टस,कॉमर्स घाटनांदुर,अंबाजोगाई, पद्मश्री आप्पसाहेब पवार, आर्टस, कॉमर्स अॅन्ड सायन्स सिनियर कॉलेज, अंबाजोगाई, बी.एस.पी संस्था खोलेश्वर महाविद्यालय,अंबाजोगाई, एम.एस.पी.महामंडळ राजमाता जिजाऊ महाविद्यालय,किल्लेधारूर, लोकशक्ती पी.एस.अॅन्ड ज्युनियर कॉलेज,देवदहिफल, किल्लेधारूर, नाथकृपा माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालय,कसारी, किल्लेधारूर, अॅड बी.डी.हंबर्डे महाविद्यालय,आष्टी, एसी.एस कॉलेज ऑफ फॉरम्सी, आष्टी, आनंदराव धोंडे, आर्टस,कॉमर्स अॅन्ड सायन्स,आष्टी, आर.बी.अट्टल, आर्टस,कॉमर्स अॅन्ड सायन्स,गेवराई, त्वरितापुरी आर्टस अॅन्ड सायन्स कॉलेज, तलवाडा,गेवराई, ग्रामीण अॅडव्हान्स प्रा. इंडस्ट्रियल ट्रेनिंग इन्स्टियुट,माजलगाव, जनविकास महाविदयालय,बनसारोळा,केज, शाम जुनियर कॉलेज,केज, वैदयनाथ विधी महाविदयालय,परळी, लाटे लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविदयालय,परळी, नवगण, आर्टस,कॉमर्स अॅन्ड सायन्स,परळी, पंडीत गुरू पर्डिकर महाविदयालय,सिरसाळा,परळी, कालीकादेवी महाविदयालय, आर्टस,कॉमर्स अॅन्ड सायन्स,शिरूर कासार, श्री. स्वामी अमृत भारती सेंकन्डरी स्कुल,पाटोदा या महाविद्यालयांमध्ये "आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र (ACKVK)" चे आभासी पध्दतीने उद्धाटन पार पडणार आहे.

तरी या प्रसिध्दीपत्राकाव्दारे सर्व विदयार्थी,जनता,लोकप्रतिनिधी यांना जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय विदयालयांमध्ये उद्धाटन प्रसंगी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त यांनी केले आहे.

## मृतांच्या पत्नीस दोन लाखांचा मिळाला विमा

मारतळा प्रतिनिधी ( विलास लामतलवारे ) मारतळा : लोहा तालुक्यातील उमरा गट ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या गोविंद तांडा येथील एका ऊसतोड



कामगाराचा खासगी रुग्णालयात उपचारा दरम्यान मृत्यू झाला होता. त्यानी प्रधानमंत्री जीवन ज्योती योजने अंतर्गत विमा काढला होता. हा विमा मंजूर करणेसाठी बँक ऑफ महाराष्ट्र शाखा मारतळा येथील शाखा व्यवस्थापकांकडून पाठपुरावा करण्यात आला. आणि मयताच्या पत्नीस दोन लाखाचा रूपयांचा विमा मंजूर झाला. तो धनादेश बुधवारी (ता.१८) रोजी मयतांची पत्नीस प्रदान करण्यात आला .

गोविंदतांडा येथील भूमीहीन ऊसतोड कामगार माधव बळी चव्हाण (वय ४०) यांचे एक वर्षापूर्वी अचानक आजारी पडले व त्यांना पुढील उपचारासाठी नांदेड येथील एका खासगी रुग्णालयात उपचारा दरम्यान त्यांचा दुर्दैवाने मृत्यू झाला . त्यांनी प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना अंतर्गत ४३६ रूपये केवळ भरून दोन लाखाचा विमा काढला होता. त्याचे फलीत म्हणून त्यांना दोन लाखाचा विमा मंजूर झाला. त्यांच्या पत्नी रंजना माधव चव्हाण व त्यांचे भाऊ रोहिदास राठोड यांना दोन लाख रूपयांचा धनादेश येथील बँक शाखेचे व्यवस्थापक प्रमोद डूमणे यांचे हस्ते देण्यात आला. यावेळी उपव्यवस्थापक वैष्णवी कोम्बे विजय नागरगोजे , रोखपाल रितेश कोचे , रोहिदास राठोड, साईनाथ ढेपे, विनायक हंबर्डे, ज्ञानेश्वर पांडुर्णे आदीची उपस्थिती होती.

## महायुतीच्या वाचाळवीर नेत्यांचा विरोधात कॉँग्रेसचे आमदार सातव यांच्या नेतृत्वाखाली निदर्शने

हिंगोली :- (प्रतिनिधी) गेल्या काही दिवसांपासून महायुती मधील वाचाळवीर नेते लोकसभेतील विरोधी पक्षनेते खा.राहुल गांधी यांची हत्या करण्याच्या,त्यांना शारीरीक इजा पोहोचवण्याच्या धमक्या देत आहेत.हे अत्यंत गंभीर असून या वाचाळवीर नेत्यांविरोधात कठोर कारवाई करा या मागणीसाठी विधान परिषदेचे आमदार प्रज्ञा सातव यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसच्या वतीने दि. 19 सप्टेंबर रोजी निदर्शने करण्यात आली. या संदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जिल्हाधिकारी गोयल यांच्या मार्फत निवेदन पाठविण्यात आले.

विरोधी पक्ष नेते खासदार राहुल गांधी यांच्या विरोधात सातत्याने वाचावीर नेत्यांकडून धमक्या दिल्या जात आहेत.या संदर्भात कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा.मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधानांना पत्र लिहिले आहे पण अद्याप या धमकीबाजांवर कारवाई करण्यात आली नाही. महायुतीतील गावगुंड आमदार संजय गायकवाडने खा.राहुलजी गांधी यांची जीभ कापणाऱ्यास बक्षीस जाहीर केले तर भाजपाचा खासदार अनिल बोंडेने त्यांच्या जीभेला चटके देण्याचे वक्तव्य केले आहे.या गंभीर धमक्या असून सरकारने यांच्यावर कठोर कारवाई



करावी. विरोधी पक्ष नेते खा.राहुल गांधी यांच्याबद्दल राज्यातील महायुतीचे नेते जी भाषा वापरत आहेत,धमक्या देत आहेत त्यावर कॉंग्रेस कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला.या धमकीवीरांवर गुन्हे दाखल करुन अटक करण्यात यावी जर या धमकीबाजांवर तात्काळ कारवाई न झाल्यास कॉंग्रेस पक्षा कडून राज्य सरकार विरोधात अधिक तिव्र आंदोलन करण्याचा इशारा आमदार डॉ.प्रज्ञा सातव यांनी दिला आहे.यावेळी जिल्हाध्यक्ष दिलीप देसाई,महिला जिल्हाध्यक्ष वनिता गुंजकर,तालुकाध्यक्ष भागवत चव्हाण माजी शहराध्यक्ष बापुराव बांगर,सेवादल जिल्हाध्यक्ष सुदाम खंदारे,कृउबा संचालक शामराव जगताप,जिल्हा उपाध्यक्ष विलास गोरे,माजी नगर सेवक अनिल नेनवानी,सरपंच गजानन थोरात,विद्यार्थी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष जुबेर मामु,माजी जि.प सदस्य गजानन देशमुख,आदिवासी सेलचे जिल्हाध्यक्ष गजानन ढाकरे,महेश थोरात,कृउबा संचालक रवी डोरले,जयश्री सातव,बासीत मौलाना,हाफीज फारुखी,यश कोकरे,मुजीब कुरेशी,नेहाल कुरेशी,चंदु प्यारेवाले,जुनेद पठाण,परवेज खान,रामदास थोरात,बापुराव मगर,शेख ईसराइल,नदीम शाह,संजय डोरले यांची उपस्थिती होती.

## राजकारणाच्या सगळ्या कला माझ्या अंगात - जयसिग सोळंके

### ५ कोटींचा निधी ४४ कोटी वर मी नेला

माजलगाव - राजकारण म्हणजे समाजसेवा आणि माझाकडे याचा वसाच पिढीजात आहे त्यामुळे राजकारणाच्या दृष्टीने आवश्यक त्या सगळ्या कला माझ्या अंगात आहेत विकासाच्या दृष्टीने माझा वापर करून घ्या त्याचाच परिपाक म्हणून बीड जिल्ह्याला ५ कोटीचा निधी मी माझा प्रयत्नातून ४४ कोटींवर नेत विकासाचा ध्यास घेतला आहे त्यामुळे मला संधी द्या मी दादा पेक्षा दहा पटीने मतदार संघ पुढे नेईल असे आवाहन घेतलेल्या कार्यकर्ता बैठकीत जयसिग सोळंके यांनी केले असून विधासभेच्या आखाड्यात आपले आवाहन उभे केले आहे.

जयसिग सोळंके यांनी र कॉ च्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक आयोजित केली होती त्यावेळी बोलताना ते म्हणाले की,२०१९ लाच माझी उमेदवारी प्रकाश दादांनी जाहीर केली होती परंतु त्यावेळी मीच त्यांना म्हणलो की पराभव झाला म्हणून निवृत्त होऊ नका विजयी आमदार होऊन तुम्हाला काय निर्णय घ्यायचा तो घ्या त्यामुळे माझा खेळी या काय असतात त्या कोणालाच कळल्या नाहीत मी कधी कोणाच्या आड येत नाही अनावधानाने माझ्याकडून काही चुका झाल्या असतील तर भाऊ,मुलगा म्हणून मला साथ द्या माझा उमेदवारीची काळजी करण्याची गरज नाही गेल्या दोन पिढ्या या राजकारणात असून त्यांचे सगळे गुण माझा अंगात अंगीकृत करण्याचा प्रयत्न मी पुरेपूर केला आहे त्यामुळे दादा हे माझा पाठीमागे खंबीर असल्याने मला भीती नाही असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अनेकांच्या खोड्या सुरू.....

आपल्यामध्ये अनेक जण असे आहेत की हा आला की आपली दुकानदारी बंद होईल दादाला समोर आपले पितळ उघडे करेल त्यामुळे अनेकांची झोप उडाली असून पाठीमागून खोड्या सुरु केल्या आहेत त्यांची आगामी काळात त्यांची खैर नाही असे ही दम देत म्हणाले. समाजाचा वापर स्वतःसाठी करणारे



पाहतात आमदार होण्याचे स्वप्न

आ. प्रकाश सोळंके यांनी सर्व समाजातील लोकांना प्रतिनिधित्व देऊन त्यांच्यावर विश्वास ठेवला परंतु काहींनी विश्वासघात केला समाजाच्या नावावर अनेकांनी आपला स्वतःचा फायदा करून घेतला आणि पदाचा मिरवणूक करून घेतली त्यामुळे मतदार संघातील जनता हे सगळे जाणून असून स्वतःच्या फायद्यासाठी यापुढे काम करणाऱ्याला यापुढे चालणार नाही असे जयसिग सोळंके म्हणाले.

भेटलेला निधी मतदार संघात का नाही

भाजपचे हाबडा फेम म्हणून घेणाऱ्या नेत्याला दोन कोटींचा निधी उपलब्ध झाला होता तो या ठिकाणी न वापरता तो केज मतदार संघात वापरण्यात येतो हा नेमका प्रकार कोणता आहे समजा याना १०० कोटी भेटले तर हे काय करतील हा प्रश्न आहेच असा चिमटा रमेश आडसकर याना मारला.

## शिवशंकर धोंडगे यांची राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या विधानसभा अध्यक्षपदी निवड

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : मागील कित्येक वर्षापासून राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाचे एकनिष्ठेने काम करणारे ग्रामीण भागातील कार्यकर्ते म्हणून ज्यांची ओळख असणारे शिवशंकर सदाशिवराव पाटील धोंडगे यांची कंधार-लोहा विधानसभा अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. ग्रामीण भागात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला अडचणीच्या काळात एकनिष्ठेने बळकटी देण्याचे काम धोंडगे यांनी केले आहे. तसेच पक्षाने वेळोवेळी राबविलेल्या विकासात्मक कार्यक्रमात त्यांनी भाग घेतला याचेच



फलित म्हणून पक्षाने त्यांच्यावर कंधार- लोहा विधानसभा अध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली आहे. त्यांची ही निवड राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (शरद पवार गटाचे) जिल्हाध्यक्ष- भगवानराव पाटील आलेगावकर प्रा.डी.बी जांभरुणकर, डॉ.परशुराम वरपडे, सुभाष गायकवाड, प्रा.मझरोद्दीन, गजानन पाम्पटवार, पुंडलिक कऱ्हाळे, नितीन वाघमारे, प्रभाकर पवार, संजय वडवळे, रेखाताई राहेरे, आदींच्या उपस्थितीत नियुक्ती पत्र देऊन करण्यात आली आहे. या निवडीबद्दल शिवशंकर पाटील धोंडगे यांचे सर्वच स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

## नांदेड जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना २५ टक्के अग्रीम देण्याच्या विमा कंपनीला सूचना

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड : जिल्ह्यातील सर्व महसूल मंडळातील पिकांच्या उत्पादनामध्ये ५० टक्केपेक्षा जास्त घट अपेक्षित असल्याचे जिल्हास्तरीय समितीने आपले निरीक्षण नोंदविले आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत मोबदला देण्यासाठी असलेल्या नियमानुसार पिक विमा कंपन्यांनी २५ टक्के अग्रीम तातडीने द्यावा, अशी सूचना विमा कंपनीला करण्यात आली आहे. जिल्हास्तरीय समितीने नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांसाठी प्रधानमंत्री पीक विमा योजना २०२४-२५ अंतर्गत हंगामातील प्रतिकुल परिस्थिती अर्थात मिड सेशन अॅडव्हरसिटी अशी अधिसूचना लागू केली आहे. त्यामुळे समितीच्या सर्वेक्षण अहवालानुसार नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये पिकांच्या उत्पादनामध्ये ५० टक्के पेक्षा जास्त घट अपेक्षित आहे. त्यामुळे




समितीने जिल्ह्यातील कापूस, सोयाबीन, तूर, ज्वारी या पिकांसाठी हंगामातील प्रतिकूल परिस्थितीची अधिसूचना लागू केली आहे. त्यामुळे सर्व महसूल मंडळातील पात्र विमाधारक शेतकऱ्यांना विहित मुदतीत नुकसान भरपाई अग्रीम रक्कम अदा करण्याचे निर्देश जिल्हास्तरीय समितीने विमा कंपनीस दिले आहेत. सद्यस्थितीत हंगामतील प्रतिकूल परिस्थिती या घटकांअंतर्गत २५ टक्के अग्रीम रक्कम मिळणार असून उर्वरीत रक्कम स्थानिक नैसर्गिक आपत्तीअंतर्गत पंचनामे व पिक कापणी प्रयोगाच्या आकडेवारीनुसार मिळेल याची सर्व शेतकरी बंधूनी नोंद घ्यावी. मोबदला कसा मिळेल हे समजून घ्यावे. कोणत्याही अपप्रचाराला बळी पडू नये, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालयाने केले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
शुक्रवार २० सप्टेंबर २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना रात्री लाईट जाणं आता रोजचंच झालंय, मोबाईल टॉर्चच्या उजेडात गृहपाठ करताना सायली सचिन वाणी इयत्ता ३ री......



# मुस्लीम समाजाविषयी गरळ ओकणाऱ्या नेत्यांवर अजित पवार नाराज

## अजित पवारांचे फेसबुक पेज हॅक ?

राज्यभरात अजित पवारांकडून जनसम्मान यात्रा काढली जात आहे. या सभांना होणारी महिलांची गर्दी आणि अजित पवार यांचे पिंक पॉलिटिक्स चर्चेचा विषय ठरत आहे. अजितदादा गटाच्या या रणनीतीला महिला मतदारांचा चांगला प्रतिसाद मिळत असताना एक धक्कादायक बाब समोर आली आहे. अजित पवार यांचे फेसबुक पेज हॅक झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. कारण अजित पवार यांचे सोशल मिडिया हँडल्स आणि फेसबुक पेजवरुन काही अज्ञात लोकांना फॉलो करण्यात आले आहे. यासंबंधी आम्ही सायबर पोलिसांकडे तक्रार दाखल करणार असल्याची माहिती अजितदादा गटाचे प्रवक्ते सुरज पाटील यांनी दिली. अजित पवार यांची प्रतिमा मलीन करणाऱ्यांना तातडीने शोधून त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसकडून करण्यात आली आहे.

मुंबई / वृत्तसंस्था गेल्या काही दिवसांमध्ये भाजपच्या कट्टर हिंदुत्वाचा पुरस्कार करणाऱ्या नेत्यांकडून मुस्लीम समाजाविषयी करण्यात येत असलेल्या वक्तव्यांवर उपमुख्यमंत्री अजित पवार (Ajit Pawar) हे प्रचंड नाराज असल्याची माहिती समोर आली आहे. मुस्लीमविरोधी वक्तव्यं करणाऱ्या या नेत्यांच्या भूमिकेचा फटका आगामी विधानसभा निवडणुकीत बसू शकतो. याची दखल घेत अजित पवार आता या भाजप (BJP) नेत्यांविरोधात थेट दिल्लीतील पक्षश्रेष्ठींकडे तक्रार करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. निलेश राणे यांच्यासह भाजपचे काही नेते वारंवार मुस्लीम समाजाबाबत आक्षेपार्ह टिप्पणी करुन धार्मिक तेढ निर्माण करत आहेत. या नेत्यांविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे हे दिल्लीतील भाजप पक्षश्रेष्ठींकडे तक्रार करणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचा जो मूळ मतदार आहे, त्यामध्ये अल्पसंख्याक समुदायाचा समावेश आहे. अजित पवार आपल्या भाषणांमधून वारंवार आपण अल्पसंख्याक समाजाच्या बाजूने आहोत, असा विश्वास देत असतात. मात्र, गेल्या काही



दिवसांमध्ये भाजप नेते निलेश राणे सातत्याने मुस्लीम समाजाला अंगावर घेणारी वक्तव्यं आणि आव्हान देण्याची भाषा केली जात आहे. अजित पवार हे भाजपसोबत सत्तेत आहेत. त्यामुळे भाजप नेत्यांच्या मुस्लीम समाजाविषयीच्या वक्तव्यांबाबत अजित पवार यांची भूमिका काय, असा प्रश्न वारंवार उपस्थित केला जात आहे. या पार्श्वभूमीवर सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल हे भाजप पक्षश्रेष्ठींशी चर्चा करुन ही बाब त्यांच्या कानावर घालणार आहेत. भाजप नेत्यांच्या वक्तव्यांकडे लक्ष द्यावे, असे अजितदादा गटाकडून सांगितले जाणार आहे. या माध्यमातून आपण अजूनही मुस्लीम मतदारांच्या पाठीशी आहोत, असा संदेश देण्याचा प्रयत्न अजितदादा गट करत असल्याचे बोलले जात आहे.

## सिल्लोड केळगाव मुर्डेश्वर मुक्कामी बस सेवा तातडीने सुरु करा



संभाजीनगर प्रतिनिधी : - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाची मागणी याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष छत्रपती संभाजी नगर जिल्हा उपाध्यक्ष राहुल सुरडकर, सिल्लोड तालुका अध्यक्ष प्राध्यापक राहुल कुमार ताठे, युवक विधानसभा अध्यक्ष विजय पवार, विद्यार्थी तालुकाध्यक्ष सतीश गोरे, ज्ञानेश्वर शिंदे सह धावडा आमठाणा केळगाव येथील विद्यार्थी उपस्थित होते

## केज मतदारसंघात येणारी बीड तालुक्यातील गावे सार्वजनिक बांधाकाम विभाग, बीड मध्येच पूर्ववत ठेवावीत - माजी आमदार पृथ्वीराज साठे यांची मागणी

बीड:
केज विधानसभा मतदारसंघात येणारी बीड तालुक्यातील गावे सार्वजनिक बांधाकाम विभाग, बीड मध्येच पूर्ववत ठेवावीत अशी मागणी केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी केली. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडून उपजिल्हाधिकारी यांना गुरूवार, दिनांक १९ सप्टेंबर २०२४ रोजी निवेदन देण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, केज विधानसभा मतदारसंघातील बीड तालुक्यात असलेल्या महसुल मंडळातील ही गावे पूर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग, बीडशी संलग्न होती. ही सर्व गावे बीड शहरापासून अवघ्या



२० ते २५ किलोमीटर अंतरावर आहेत. त्यामुळे त्या गावातील लोकांना कामानिमित्त बीडला ये-जा करणे सोयीचे होते. परंतु, १८ ऑगस्टच्या आदेशानुसार केज मतदारसंघात येणारी बीड तालुक्यातील गावे ही अंबाजोगाई सार्वजनिक बांधकाम विभागास जोडली गेली आहेत. त्यामुळे त्या गावातील लोकांना अंबाजोगाईला येणे खुप लांब पडत आहे. व त्यांची गैरसोय होत आहे. तरी १८ ऑगस्टला काढलेला आदेश रद्द करून केज मतदारसंघात येणारी बीड तालुक्यातील त्या गावांचा समावेश बीड सार्वजनिक बांधकाम विभागातच करावा अशी विनंती व प्रमुख मागणी करण्यात आली आहे. सदरील निवेदनाच्या प्रतिलिपी १) मुख्यमंत्री ना.एकनाथजी शिंदे, २) उपमुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस, ३) कृषिमंत्री तथा पालकमंत्री ना.धनंजयजी मुंडे व ४) जिल्हाधिकारी, बीड यांना देण्यात आल्या आहेत. सदरील निवेदनावर माजी आमदार पृथ्वीराज साठे, ॲड.शहाजहान खान पठाण, श्रीमती सी.ए.देशमुख, तानबा लांडगे, हमीद चौधरी, रमजान गवळी, शेख खिजर शेख अफसर, सय्यद सोहेल मतीन, गफार गवळी, अमन परदेशी, अब्दुला भाई, इम्रान पठाण, फैजान मिर्झा, सुरज आव्हाड, ॲड.प्रशांत पवार, तरकसे, सुधाकर जोगदंड, सलिम पिंजारी आदींसह इतरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# डॉ. अमर आलदे यांना 'हिंदी काव्यरत्न' आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर

चौसाळा : कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा येथील नवोदित कवी डॉ० अमर आनंद आलदे यांचा नेपाळमधील लुंबिनी येथे आयोजित आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात गौरव करण्यात आला आहे. नेपाळमधील "शब्द प्रतिभा बहु-प्रादेशिक फाउंडेशन" नेपाळ या प्रसिद्ध संस्थेने आज ऑनलाइन स्पर्धेद्वारे भाषा आणि साहित्य क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या निर्मात्यांना सन्मानित केले आहे.
14 सप्टेंबर हिंदी दिवसानिमित्त "शब्द प्रतिभा बहु-प्रादेशिक पुरस्कार फाऊंडेशन नेपाळ द्वारा आयोजित केलेल्या हिंदी दिवस आंतरराष्ट्रीय काव्य स्पर्धेत अष्टपैलू शिक्षक आणि युवा साहित्यिक डॉ० अमर आनंद आलदे यांना "हिंदी काव्यरत्न" मानद पदवी देऊन गौरविण्यात आले. हे जिल्ह्यातील एक नवोदित कवि आहेत.
संस्थे चे संस्थापक अध्यक्ष आनन्द गिरि मायालु म्हणतात - डॉ० अमर आलदे यांची रचना जीवंत वाटते. यांच्या कवितेतील शब्द लालित्य वैविध्यपूर्णतेने नटलेले आहे. अशा लेखकांकडूनच खरा समाज निर्माण होतो ज्या द्वारे विकासात्मक व सकारात्मक लेखन केले जाते. अशा विशिष्ट रचनाकारांना ओळखून त्यांचा गौरव करणे हे अपेक्षित आहे.
आयोजित या स्पर्धेत नेपाळ, भारत, अमेरिका, कॅनडा आणि टांझानिया येथील 6742 स्त्री-पुरुष कवि व लेखक सहभागी झाले होते, ज्यामध्ये उत्कृष्ट कवितांच्या आधारे 675 कलावंतांची निवड करून त्यांना गौरविण्यात आले. आयोजक संस्थेचे आभार मानताना आंतरराष्ट्रीय "हिंदी काव्यरत्न" पुरस्कार प्राप्त नवोदित कवी डॉ. अमर आलदे म्हणाले " नेपाळ स्थित "शब्द प्रतिभा फाउंडेशन" वर्षानुवर्ष देश-विदेशातील कवी-लेखकांना विविध स्पर्धांच्या माध्यमातून सन्मानित करून प्रोत्साहन देत आहे. संस्थेच्या अशा कार्यामुळे आमच्यासारख्या हजारो शिक्षक आणि कवींना प्रोत्साहन मिळाले आहे यात शंका नाही." संस्थेच्या सचिव रचना कौर म्हणतात – "आज हिंदी ही कोणा एका देशाची भाषा नसून जागतिक भाषा बनली आहे. सर्वांनी आपली भाषा, साहित्य, कला, संस्कृती यांचा आदर केला पाहिजे. या स्पर्धेत देश-विदेशातील हजारो शिक्षक-लेखक सहभागी झाले होते, ही संस्थेसाठी अभिमानाची बाब आहे."
काव्यरत्न पुरस्कार बाबत नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. भारतभूषण क्षीरसागर, उपाध्यक्ष तथा सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. दीपा क्षीरसागर, सहसचिव डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर, सदस्य डॉ. सारिकाताई क्षीरसागर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास भिल्लारे, उप प्राचार्य प्रा. चांगदेव शेळके, पदव्युत्तर संचालक डॉ. सुधाकर वनवे कमविचे उपप्राचार्य प्राध्यापक गणपती ढवळशंक व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी डॉ. आलदे यांचे अभिनंदन केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com